Rayat Shikshan Sanstha's,

# Radhabai Kale Mahila Mahavidyalaya, Ahmednagar

## Central Library

# Newspaper Clipping

# (2016-2017)

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

Scanned by CamScanner

पुढारी दि. 7/7/2016

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# 'एक सेवक एक झाड' योजना

**नगर :** रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात 'एकच लक्ष्य, दोन कोटी वृक्ष' या उपक्रमांतर्गत 'एक सेवक, एक झाड' ही योजना कार्यान्वित करण्यात आली. गो ग्रीन स्वयंसेवी संस्था व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हा समारंभ पार पडला. याप्रसंगी गो ग्रीनचे दिनेश कोठारी, ॲड. प्रसन्न जोशी, सुशिल ओस्तवाल, भाऊसाहेब ढगे, ज्ञानदेव पांडुळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दादाभाऊ कळमकर होते. प्रारंभी महाविद्यालयाच्या आवारात जेवढे सेवक आहेत. तेवढी झाडे त्यांच्या नावाने प्रमुख पाहुणे व विद्यार्थिनींच्या हस्ते लावण्यात आली. त्यानंतर बारावी ते पदवी परीक्षांमध्ये नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या पूनम दारकुंडे, पायल सैंदे, श्रुती वराडे, रेणुका पोटे, क्रांती बारस्कर, शुभांगी घोडके, निता ठुबे या विद्यार्थिनींचा वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला. उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. संजय नगरकर यांनी केले.



**नगर :** रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात 'एकच लक्ष्य, दोन कोटी वृक्ष' या उपक्रमांतर्गत 'एक सेवक, एक झाड' ही योजना गुणवंत विद्यार्थिनींना रोपांचे वाटप करून सुरू करण्यात आली.

पुढारी ११।८।२०१६

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर

# 'राधाबाई काळे'ला एम. कॉम.ची मान्यता

**नगर :** येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत एम कॉम अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली अहे. यासंदर्भात महाविद्यालयाने प्रस्ताव पाठवला होता. त्यावर विद्यार्थिनींची संख्या व पायाभूत सुविधांची तपासणी करण्यात आली होती. त्यानंतर राज्य सरकारने २०१६-१७ पासून अभ्यासक्रम सुरु करण्यास म ान्यता दिली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी दिली. अभ्यासक्रमाच्या संलग्रतेच्या संदर्भात विद्यापीठाची समिती लवकरच महाविद्यालयास भेट देणार आंहे. बी. कॉम पूर्ण झालेल्या विद्यार्थिनींनी अधिक माहितीसाठी प्रा. महेश जाधव, प्रा. शुभांगी ढुबे, प्रा. निर्मला चौधरी यांच्याशी संपर्क साधावा.

Scanned by CamScanner

लोकमत दि. 27/7/2016

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# राधाबाई काळे महिला कॉलेजचा उत्कृष्ट निकाल

**अहमदनगर :** येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या एम. ए. व एम. एस्सी. या वर्गांचा निकाल उत्कृष्ट लागला. एम. ए. मराठी, हिंदी व इंग्रजी या विषयांचे निकाल १०० टक्के लागले.

एम. एस्सी. रसायनशास्त्र विषयाचा निकाल ९० टक्के लागला असून पदव्युत्तर वर्गातून वृषाली गायकवाड (८२.१९) प्रथम आली. गुणानुक्रमे मराठी एम. ए.मध्ये माधुरी शिंदे (द्वितीय), श्रद्धा भिंगारदिवे (तृतीय), शेख सना (तृतीय), इंग्रजी एम. ए. मध्ये कोमल गायकवाड (प्रथम), दिपाली हुलगे (द्वितीय), गितांजली शेटे (तृतीय), एम. एस्सी. रसायनशास्त्रात शिल्पा दळवी (प्रथम), कोमल सोनवणे (द्वितीय), तर पूजा मगर यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

महाविद्यायात नेट-सेट मार्गदर्शन वर्ग, स्पर्धा परीक्षा तयारी, संशोधन कार्यशाळा आदी उपक्रम व पायाभूत सुविधांची उपलब्धता यामुळे पदव्युत्तर वर्गाचा गुणात्मक दर्जा विकसित होऊ लागल्याचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी सांगितले. यशस्वी विद्यार्थ्यांचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य अशोक काळे, आशुतोष काळे, स्नेहल शिंदे, डॉ. रावसाहेब अनभुले, ज्ञानदेव पांडुळे, भाऊसाहेब ढगे आदींनी कौतुक केले. (प्रतिनिधी)

Scanned by CamScanner

सकाळ १९/८/२०१६
पान. नं. ३

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# पर्यावरणविषयक धोरणांचा अवलंब व्हावा : डॉ. कराळे

**नगर, ता. १८ :** ''वाढत्या शहरीकरण व जागतिकीकरणाचा पर्यावरणावर अनिष्ट परिणाम होत आहे. तो थोपविण्यासाठी सरकारतर्फे 'झाडे लावा, झाडे जगवा', तसेच 'पाणी हेच जीवन' या सरकारी धोरणांची अंमलबजावणी होण्याची गरज आहे. प्रत्येकाने त्या दृष्टीने प्रयत्न करावेत,'' असे विचार प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी व्यक्त केले. रयत शिक्षण संस्थेच्या येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या निसर्ग मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. निसर्ग मंडळाच्या प्रमुख प्रा. डॉ. एस. ए. कुलकर्णी यांनीही प्रास्ताविकात मंडळाच्या कार्याची माहिती दिली. प्रा. वृषाली दिघे यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned by CamScanner

पुण्यनगरी दि. १०/८/२०१६

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१



(छाया : चंद्रकांत गायकवाड, आदिनाथनगर)

# क्रॉसकंट्री स्पर्धेत मुलींची बाजी..

आदिनाथनगर/प्रतिनिधी- जिल्हा क्रीडा विभाग व राजळे महाविद्यालय यांच्या विद्यमाने (आज ९ ऑगस्ट) पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेत मुलींनी बाजी मारली. यामध्ये जिल्ह्यातील सुमारे तेवीस महाविद्यालयांनी सहभाग घेतला. स्पर्धा पार पडल्यानंतर विजेत्यांना समारंभपूर्वक बक्षिसांचे वितरण झाले. सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामदास म्हस्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

निवृत्त अधीक्षक अभियंता, शिवाजी राजळे, क्रीडा सचिव एच.एस. विखे, नितीन वाळुंज, एस.डी. चोरमले, प्राचार्य राजधर टरमकर आदी अतिथी याप्रसंगी मंचावर होते. या वेळी शिवाजी राजळे म्हणाले सर्वांगीण खेळात रुची असणाऱ्या विद्यार्थ्यांची अभ्यासासह इतर पुरक शैक्षणिक उपक्रमांतही कायम प्रगती होते. खेळांव्दारे सदृढ शरीर, निकोप मैत्रीची वृध्दी याचबरोबर निसर्गाबद्दलची अभिरुचीही निर्माण होते. विद्यार्थ्यांच्या ध्येय निश्चितीसाठी केवळ उद्दिष्टे असून, भागत नाही, ती पूर्ण करण्यासाठीची पुरक व्यवस्थाही हवी. अशा सर्वांगीण खेळ व्यवस्था पूर्तीसाठी राजळे महाविद्यालय यापुढे कटिबध्द असेल, असा विश्वासही राजळे यांनी व्यक्त केला. प्रा. टेमकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आर. बी. आदलिंग यांनी आभार मानले. किशोर गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. ऐश्वर्या कल्याणकर, श्रध्दा वामन, तेजस्वीनी बनसोडे, सुवर्णा पिंजारी, रामेश्वरी पालवे, मयुरी कुळधरण, वैशाली भाटे, किशोर मरकड, सचिन गायके आदींसह सुमारे २ खेळाडूंना याप्रसंगी गौरविण्यात आले.

Scanned by CamScanner

लोकमत दि. २/०८/१८,
हॅलो अ. नगर पान नं ८

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर - ४१४००१

## राधाबाई काळे महाविद्यालयात मार्गदर्शन

अहमदनगर : वेळेचे नियोजन हा स्पर्धा परीक्षांचा आत्मा असतो. सर्व विषयांचा एकमेकांशी संबंध असल्याने त्यातून आपली दृष्टी परिपक्व होते. थोडा धीर धरुन मेहनत घेतली, आत्मविश्वाने परीक्षेला सामोरे गेले, तर स्पर्धा परीक्षांएवढी सोपी कोणतीं गोष्ट नाही, असा मंत्र यूपीएससी उत्तीर्ण आयपीएस अधिकारी रोहन बोत्रे, यांनी दिला. परीक्षा केंद्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय नगरकर यांनी प्रास्ताविक केले. योगेश तंवर यांनी आभार मानले. प्रा. सचिन कोतकर यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned by CamScanner

**Sakal, Dated 19/08/2016, Page No. 3**

राधाबाई काळे महिला महाविद्यालय ग्रंथालय अहमदनगर

# पर्यावरणविषयक धोरणांचा अवलंब व्हावा : डॉ. कराळे

**नगर, ता. १८ :** "वाढत्या शहरीकरण व जागतिकीकरणाचा पर्यावरणावर अनिष्ट परिणाम होत आहे. तो थोपविण्यासाठी सरकारतर्फे 'झाडे लावा, झाडे जगवा', तसेच 'पाणी हेच जीवन' या सरकारी धोरणांची अंमलबजावणी होण्याची गरज आहे. प्रत्येकाने त्या दृष्टीने प्रयत्न करावेत," असे विचार प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी व्यक्त केले. रयत शिक्षण संस्थेच्या येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या निसर्ग मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. निसर्ग मंडळाच्या प्रमुख प्रा. डॉ. एस. ए. कुलकर्णी यांनीही प्रास्ताविकात मंडळाच्या कार्याची माहिती दिली. प्रा. वृषाली दिवे यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned by CamScanner

हॅलो अहमदनगर

सकाळ दि. १४/८/२०१६ पान नं. ३

सकाळ
पुणे, रविवार, १४ ऑगस्ट २०१६
३

## राधाबाई काळे महाविद्यालयात ग्रंथपाल दिन साजरा


नगर, ता. १३ : राधाबाई काळे महिला महाविद्यालयात डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त काल ग्रंथपालदिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, वैचारिक ग्रंथ, ललित ग्रंथ, पाठ्यपुस्तके यांचे विषयवार प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांच्या हस्ते झाले. उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी, प्रा. एन. आय. सय्यद, प्रा. ए. के. कापरे आदी उपस्थित होते. विद्यार्थिनींनी प्रदर्शनास भेट दिली.

राधाबाई काळे महिला महाविद्यालय ग्रंथालय अहमदनगर

पुढारी दि. १४/८/२०१६ पान नं. ९

## काळे महिला विद्यालयात ग्रंथपाल दिन

नगर : राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या चितळे-तुळपुळे ग्रंथालयाच्यावतीने डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, वैचारिक



ग्रंथ, ललित ग्रंथ, पाठ्यपुस्तके यांचे प्रदर्शन भरण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी, प्रा. एन. आय. सय्यद, प्रा. मनोहर करांडे, प्रा. एस. पी. नगरकर, प्रा. एस. एस. कातोरे, आर. बी. शेटे आदी उपस्थित होते. दिवसभरात २ हजार विद्यार्थिनींनी प्रदर्शनास भेट दिली. प्रदर्शनाचे आयोजन ग्रंथपाल डी. आय. शिंगाडे, सहाय्यक अप्पासाहेब शेळके, राजेश पंडीत यांनी केले.

लोकमत दि. १४/८/२०१६ पान नं. ४

## ग्रंथपाल दिन साजरा

अहमदनगर : राधाबाई काळे महाविद्यालयात चितळे-तुळपुळे ग्रंथालयाच्या वतीने डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंती निमित ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. यावेळी संदर्भग्रंथ, वैचारिक ग्रंथ, ललित ग्रंथ, पाठ्य पुस्तके यांचे प्रदर्शन भरवण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. भाऊसाहेब औटी, एन.आय. सय्यद, ए.के. कापरे आदी उपस्थित होते.

Scanned by CamScanner

पेपर - दै. दिव्य मराठी. दि. २५/८/१६, पुरवणी पान नं ४

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर - ४१४००१

कार्यशाळा

काळे महाविद्यालयातील कायदेविषयक कार्यशाळेत जिल्हा न्यायाधीश सुवर्णा केवले यांचे प्रतिपादन

# सौंदर्यापेक्षा कर्तबगारीला द्यावे मुलींनी महत्त्व

प्रतिनिधी | नगर

आपल्या कर्तबगारीने सुवर्णाक्षरांनी स्थान मिळवलेल्या महिलांमुळे आपल्याला देशाचा अभिमान सर्वांना वाटतो. याच महिलांचा आदर्श घेत सध्याच्या पिढीतील मुलींनी सौंदर्यापेक्षा कर्तबगारीला अधिक महत्त्व देत अन् आपल्या पालकांचे नाव उज्ज्वल करावे, असे जिल्हा न्यायाधीश सुवर्णा केवले यांनी सांगितले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व शहर वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी राधाबाई काळे महाविद्यालयात कायदेविषयक जनजागृती शिबिर घेण्यात आले. अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश केवले होत्या. त्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुमन पवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. उपप्राचार्य भाऊसाहेब औटी यांनी पाहुण्यांचा सत्कार केला.



राधाबाई काळे महाविद्यालयात आयोजित कायदेविषयक जनजागृती शिबिरात मार्गदर्शन करताना जिल्हा न्यायाधीश सुवर्णा केवले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा जिल्हा न्यायाधीश एम. एच. शेख यांनी प्रास्ताविक केले. मुख्य न्यायदंडाधिकारी एस. एस. जगताप, अ‍ॅड. प्रज्ञा हेंद्रे, श्रद्धा कुलकर्णी, अ‍ॅड. सागर पादीर यांनी रॅगिंग, लैंगिक छळ, कौटुंबिक छळ, सायबर क्राईम या विषयावरील कायद्यातील कलमांची विस्तृत माहिती दिली. या कायद्यांचा आपल्या व इतरांच्या सुरक्षिततेसाठी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

शहर वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. लक्ष्मण कचरे यांनी महाविद्यालयात येताना व जाताना काय काळजी घ्यावी, तसेच काही अनुचित प्रकार घडल्यास तक्रार कशा पद्धतीने व कुठे करावी, याबाबत मार्गदर्शन केले. या शिबिराचे सूत्रसंचालन प्रा. रवी ठोंबरे यांनी केले. आभार प्रा. भाऊसाहेब औटी यांनी मानले. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थिनींनी या शिबिराचा लाभ घेतला. या शिबिराला जिल्हा न्यायालयात नव्याने रुजू झालेले प्रशिक्षणार्थी न्यायाधीश बी. जी. पवार, एस. एस. काळे, पी. व्ही. सपकाळ, पी. व्ही. राऊत उपस्थित होते.

Scanned by CamScanner

दै. पुढारी दि. २८।४।१८, पुरवणी पान नं.३.



## संक्षिप्त



**नगर :** राधाबाई काळे महिला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर बोलताना निवडणूक अधिकारी अरुण आनंदकर.

# उच्च पदाचे ध्येय साध्य करा : आनंदकर

**नगर :** विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत असताना उच्च अधिकारी पदाचे ध्येय साध्य झाले नाही तरी, त्यावेळी केलेल्या अभ्यासामुळे व तयारीमुळे आपले व्यक्तीमत्त्व सर्वांगिणदृष्ट्या घडते. त्यामुळे पुढील आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात आपण सर्वोच्चस्थानी जाण्यासच मदत होते, असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी निवडणूक अधिकारी अरुण आनंदकर यांनी केले. राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील विद्यार्थिनींसमोर स्पर्धा परीक्षा अभ्यासाची फलश्रुती या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे होते. यावेळी करिश्मा पटेल, शितल गौड, आदिती सत्रे, सुमैय्या शेख या विद्यार्थिनींनी चर्चेत सहभाग घेतला. प्रास्ताविक व स्वागत केंद्र समन्वयक प्रा. डॉ. संजय नगरकर यांनी केले. प्रा. अमोल बुचुडे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. योगेश तंवर यांनी केले. यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. गायत्री शिंदे, प्रा. गणेश जाधव, प्रा. रविप्रकाश ठोंबरे, प्रा. सचिन कोतकर, प्रा. महेश जाधव, प्रा. शुभांगी ठुबे, प्रा. निर्मला चौधरी व प्रा. अनूप शिंदे यांनी परिश्रम घेतले.

Scanned by CamScanner

पुण्य नगरी दि. ०२/०९/२०१८ (पुरवणी)
पृष्ठ क्र.०१

राधाबाई काळे महिला ... ग्रंथालय अहमदनगर-४१४००१

# पुस्तक परिक्षण स्पर्धेतून वाचन संस्कृतीची जपवणूक

अहमदनगर / प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये सध्या अभ्यासबरोबरच अवांतर वाचनाचे प्रमाण कमी होत चालले आहे. तसेच सर्व स्तरातील नागरिकही वाचन संस्कृतीपासून दूरावत आहेत. अशा परिस्थितीत पुस्तक परिक्षण स्पर्धेचे आयोजन करुन अनोखा उपक्रम राबविला आहे. या पुस्तक परिक्षण स्पर्धेमुळे ऱ्हास होत असलेली वाचन संस्कृती जपली जाईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिका डॉ.लिला गोविलकर यांनी केले.



पेमराज सारडा महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने शहरात प्रथमच आंतर महाविद्यालय पुस्तक परिक्षण स्पर्धा पद्मश्री डॉ. शि. रा. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून घेण्यात आली. पदवी व पदव्युतर विभागात झालेल्या या स्पर्धेला शहरातील १७ महाविद्यालयांनी प्रतिसाद देत ९१ स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे डॉ.गोविलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी प्रा.शिरिष मोडक, सुनिल रामदासी, प्राचार्या डॉ.अमरजा रेखी, उपप्राचार्या सुजाता काळे, अशोक असेरी, प्रा.अर्जुन कांबळे, डॉ.राजेंद्र मारवाडे, परिक्षक प्रा.देवदत्त रानडे, डॉ.मच्छिंद्र मालुंजकर, डॉ.राजू रिक्कल, डॉ.राहुल पंडित, प्रा.कृष्णा पाटील आदिंसह विद्यार्थी व प्राध्यापकवर्ग उपस्थित होते.

गोविंलकर पुढे म्हणाल्या, मनुष्य घडविण्याचे काम ग्रंथ करत असतात. अनेक ग्रंथांचे आकलन करुन त्यांचे परिक्षण करणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन जीवन विद्यार्थ्यांनी गांभिर्याने घेऊन जास्तीत जास्त वाचन करावे. स्पर्धेतील निकाल पुढीलप्रमाणे - पदवी पर्यंतचे प्रथम- कु.मोहिनी बारटक्के,विद्या प्रतिष्ठान, शिक्षणशास्त्र महाविद्यालय. द्वितीय - कु.शुभदा सातपुते, सारडा महाविद्यालय. तृतीय (विभागून) - कु.शालिनी शर्मा, न्यू लॉ कॉलेज व वनिता दारकुंडे. पदव्युत्तर विभागात : प्रथम - कु.सिमा गायकवाड, राधाबाई काळे महाविद्यालय. द्वितीय (विभागून)- विक्रांत जाधव, सीएसआरडीई व विणा कुऱ्हाडे, न्यू आर्टस महाविद्यालय. तृतीय (विभागून)- संतोष भागवत, सारडा महाविद्यालय व कु.हिताक्षी मकासरे, पी.व्ही.पी.फार्मसी, विळद घाट.

Scanned by CamScanner

दिव्य मराठी दि. २५/९/२०१६ पुरवणी, पान नं. ४

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# विद्यार्थिनींनी स्वतःच संधी शोधावी

प्रतिनिधी | नगर

नव्या युगात यश मिळवायचे असेल, तर सरकार आमच्यासाठी काही करेल याची वाट न पाहता संधी शोधल्या पाहिजेत, असे प्रतिपादन आमदार दिलीप वळसे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १२९ व्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी वळसे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य अशोक काळे होते. यावेळी उपाध्यक्ष दादा कळमकर, आमदार संग्राम जगताप, आशुतोष काळे, डॉ. रावसाहेब अनभुले, ज्ञानदेव पांडुळे, भाऊसाहेब ढगे, संदीप वर्पे, सोमनाथ धूत, विश्वास काळे, अमृता कोळपकर, बेबी गायकवाड आदी उपस्थित होते.



काळे महाविद्यालयात बोलताना दिलीप वळसे. छाया : उदय जोशी.

वळसे म्हणाले, शोधलेल्या संधीतून यशाचा मार्ग चोखाळला पाहिजे, कारण अनेक संधी आज उपलब्ध आहेत. एक काळ असा होता, की उच्च व तंत्रशिक्षणाच्या संधीच नव्हती. राज्यातील तरुणांना बाहेरच्या राज्यात जाऊन शिकावे लागायचे. परंतु, कर्मवीरांनी सर्व घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. आणखी ५० वर्षे आपण शिक्षणाच्या दरवाजापर्यंत पोहोचू शकलो नसतो. त्यांच्याच प्रेरणेने स्व. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी उच्च व तंत्र शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या, असे वळसे म्हणाले.

व्यावसायिक शिक्षणासाठी सर्व जाती घटकातील विद्यार्थिनींनी पायाभूत संशोधन, ज्ञानातील सातत्य राखले पाहिजे, तरच भारत महासत्ता बनू शकेल, असे काळे यांनी सांगितले.

Scanned by CamScanner

सकाळ दि. 11/10/2016 पुरवणी पा.नं 3

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१



नगर : राधाबाई काळे महिला महाविद्यालयात बोलताना न्यू आर्ट्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे.

# विज्ञानाचे उपयुक्ततामूल्य जपायला हवे : डॉ. झावरे

नगर, ता. १० : "दैनंदिन जीवनात विज्ञानाशी संबंधित विविध अनुभव आपणास येतात. अशा वेळी वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत ठेवून विज्ञानाचे उपयुक्ततामूल्य जपले पाहिजे. तसेच, केवळ पदवी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी नव्हे, तर शिक्षणाचा उपयोग व्यक्तिगत आयुष्यात होईलच, यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे विचार न्यू आर्ट्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. महापौर सुरेखा कदम, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य ज्ञानदेव पांडुळे, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी, प्रा. नासीर सय्यद, प्रा. अनिल कापरे या वेळी उपस्थित होते.

अभ्यासासोबत मुलींनी स्वतःच्या संरक्षणाची खबरदारी घ्यावी, असे आवाहन महापौर कदम यांनी केले. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. वृषाली दिघे यांनी सूत्रसंचालन केले. विज्ञान मंडळाच्या प्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा रांधवणे यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner

सकाळ दि. १७/०९/१६ पुरवणी पान नं ४

राधाबाई काळे महिला महाविद्यालय * अहमदनगर-४१४००१ * ग्रंथालय



द्रपदा, चंद्रराशी
, चंद्रोदय सायं.
यारंभ, प्रतिपदा
क १९३८.

# पारंपरिक जोखडातून बाहेर पडा : पाटील



नगर : 'रयत'च्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात विद्यार्थिनी व शिक्षकांना मार्गदर्शन करताना संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील. समवेत संस्थेचे उपाध्यक्ष दादा कळमकर, व्यवस्थापन समितीच्या सदस्य मीनाताई जगधने, ज्ञानदेव पांडुळे आदी.

**नगर, ता. १६ :** "पारंपरिक शिक्षणपद्धतीच्या जोखडातून देश बाहेर पडत आहे. त्यामुळे उभ्या राहणाऱ्या नव्या आव्हानांचा सामना करण्यासाठी शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी सज्ज असायला हवे," असे विचार रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांनी व्यक्त केले.

लायन्स क्लबतर्फे डॉ. पाटील यांना 'जीवनगौरव' पुरस्कार देण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे उपाध्यक्ष दादा कळमकर, व्यवस्थापन समितीच्या सदस्य मीनाताई जगधने, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य ज्ञानदेव पांडुळे आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, "मेकॉले प्रणीत कारकुनी शिक्षणप्रणालीच्या बाहेर पडण्याची वेळ आली आहे. जगभर माहिती तंत्रज्ञान व अन्य क्षेत्रांत वेगाने घडत असलेल्या बदलांचा शिक्षणावर परिणाम होत आहे. त्यात संशोधन, कौशल्यविकास आणि शिक्षणाचे खासगीकरण, यामुळे पारंपरिक शिक्षण तकलादू बनत चालले आहे. त्याचा विचार प्रत्येकाला करावा लागेल."

प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी यांनी आभार मानले. प्रा. डॉ. संजय नगरकर यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned by CamScanner

लोकमत दि. २५/९/२०१६ पुरवणी पान नं. ४

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

लोकमत दि. २५/९/२०१६ पुरवणी पान नं. ४

# शिक्षकांनी संशोधन करावे

## दिलीप वळसे : राधाबाई काळे महाविद्यालयात कर्मवीर जयंती साजरी



**अहमदनगर :** दर्जेदार शिक्षण व विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षकांनी व्यापक ज्ञान आत्मसात करुन संशोधनावर भर द्यावा, असे आवाहन विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे यांनी केले.

शहरातील राधाबाई काळे महिला महाविद्यालयात पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १२९ जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी आमदार अशोक काळे, दादा कळमकर, आ. संग्राम जगताप, आशुतोष काळे, डॉ. रावसाहेब अनभुले, ज्ञानदेव पांडुळे, भाऊसाहेब ढगे आदी उपस्थित होते.

वळसे म्हणाले, एकेकाळी महाराष्ट्रातील तरुणांना बाहेरच्या राज्यात जाऊन शिक्षण घ्यावे लागत होते. कर्मवीरांनी विद्यार्थ्यांसाठी स्वावलंबन व शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या. त्यांच्याच प्रेरणेने यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व शरद पवार यांनी आपल्या कार्यकाळात उच्च व तंत्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या. त्यामुळे महाराष्ट्रातील तरुण पिढ्या उच्च व तंत्रशिक्षण घेऊन शकत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क भरण्याची सरकारने व्यवस्था केली आहे. प्राचार्य भाऊसाहेब काळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भाऊसाहेब औटी यांनी आभार मानले. प्रा. डॉ. संजय नगरकर यांनी व वृषाली दिघे यांनी सूत्रसंचलन केले. (प्रतिनिधी)

Scanned by CamScanner

# विद्यार्थ्यांनी करिअरच्या संधी शोधाव्यात

## दिलीप वळसे पाटील; काळे महिला महाविद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा

नगर, ता. २४ : नव्या युगात सरकार आपल्यासाठी काहीतरी करेल, ही अपेक्षा विद्यार्थ्यांनी सोडून द्यावी. स्वतःच करिअरच्या नव्या संधी शोधून यशाचा मार्ग चोखाळला पाहिजे. विविध क्षेत्रांत संधी उपलब्ध आहेत. त्यात विद्यार्थ्यांनी भविष्य घडवावे, असे विचार विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थचे माजी कौन्सिल सदस्य अशोक काळे, उपाध्यक्ष दादा कळमकर, आमदार संग्राम जगताप, व्यवस्थापन समितीचे सदस्य आशुतोष काळे, डॉ. रावसाहेब अनभुले, ज्ञानदेव पांडुळे, भाऊसाहेब ढगे, संदीप वर्पे, सोमनाथ धूत, प्राचार्य विश्वास काळे आदी या वेळी उपस्थित होते.



**नगर : राधाबाई काळे महिला महाविद्यालयात आयोजित डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती सोहळ्यात बोलताना विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील.**

वळसे पाटील म्हणाले, "काही वर्षांपूर्वीपर्यंत राज्यात उच्च व तंत्रशिक्षणाच्या संधीच उपलब्ध नव्हत्या. बाहेरच्या राज्यात जाऊन ते शिक्षण महाराष्ट्रातील तरुणांना घ्यावे लागत होते. सुदैवाने आता ही संधी राज्यातच उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांनी तिचा फायदा घेतला पाहिजे."

आशुतोष काळे यांनी संस्थेच्या भविष्यातील विकासात्मक उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनी व कर्मचाऱ्यांचा या वेळी गौरव करण्यात आला.

प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. प्रा. डॉ. संजय नगरकर व प्रा. वृषाली दिघे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी यांनी आभार मानले.

सकाळ
दि. २५/१/२०१६
पान नं. 2

राधाबाई काळे महिला महाविद्यालय ग्रंथालय अहमदनगर-४१४००१

दूरध्वनी : ०७१०४ - २४६१४५ ते २४६८४९ आणि २४६१४५ ते २४६१४९
फॅक्स : ९१-७१०४ - २४६७०५
ई-मेल : ofaj.ofb@nic.in

दैनिक लोकमत दि. १७/१२/२०१६
हॅलो अहमदनगर पुरवणी -
पान नं. ४

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# महिला कॉलेजची विद्यार्थिनी मॅरेथॉनमध्ये चमकली

**अहमदनगर :** लोकमत समूहाने औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या मॅरेथॉन स्पर्धेत येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी तेजस्विनी बनसोडे हिने तृतीय क्रमांक पटकावला.

औरंगाबाद येथे राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत नगर येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी तेजस्विनी बनसोडे हिने तृतीय क्रमांक पटकावला. बनसोडे हिने या आधीही पुणे विद्यापीठाच्या मैदानी स्पर्धांमध्ये,



**तेजस्विनी बनसोडे**

यश मिळवलेले आहे. याबद्दल तिचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य अशोक काळे, उपाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, आशुतोष काळे, स्नेहल शिंदे आदींनी अभिनंदन केले. क्रीडा संचालक प्रा. बुवासाहेब ढेरे व प्रा. संजय पाटील यांचे मार्गदर्शन तिला लाभले. (प्रतिनिधी)

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर - ४१४००१

दिव्य मराठी, पुरवणी पृष्ठ क्र. 1
दिनांक 20/10/2016.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालयात 'फटाकेमुक्त दिवाळी'चा संकल्प

## फटाके न फोडण्याची विद्यार्थिनींची शपथ

प्रतिनिधी | नगर

फटाक्यांमुळे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला. 'दिव्य मराठी'ने फटाक्यांच्या दुष्परिणामांबाबत जागृती करणारे वृत्त प्रसिद्ध केले. त्याची दखल घेत विद्यार्थिनींनी यंदा फटाकेमुक्त दिवाळीची शपथ घेतली. फटाके कसे धोकादायक रसायनांपासून बनवले जातात, याची माहिती यावेळी विद्यार्थिनींना देण्यात आली.

महाविद्यालयातील प्राचार्य व सर्व प्राध्यापक या उपक्रमात सहभागी झाले आहेत. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे म्हणाले, समाजात चंगळवादाचा प्रभाव वाढला आहे. अशावेळी आपण सण-समारंभ आनंदाने साजरे केले पाहिजेत. ज्यांच्या घरात सणाचा सुगंधही पोहोचत नाही, त्यांचाही विचार करायला हवा. आरोग्य बिघडवणारे फटाके खरेदी करून आपण काय साध्य करतो? फटाक्यांवर हजारो रुपये खरेदी करून क्षणिक आनंद घेण्यापेक्षा वंचितांच्या मुखी दोन गोड घास घातले, तर तो आनंद चिरकाळ टिकणारा असतो. दैनिक दिव्य मराठीने फटाकेमुक्त दिवाळीचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. आम्ही सर्व आज फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ घेत आहोत, असे प्राचार्य कराळे यांनी सांगितले. मराठी विभागातील प्रा. योगिता रांधवणे म्हणाल्या, दिवाळी म्हणजे आनंदाचा उत्सव. हा आनंद आपण इतरांना देत साजरा करायला हवा. फटाके फोडून प्रदूषणाला निमंत्रण देण्यापेक्षा पर्यावरणाचे संवर्धन झाले पाहिजे. फटाके खरेदी करण्यासाठी जेवढे पैसे लागतात, ते सर्व पैसे आपण सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना मदत म्हणून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

## समाजातील वंचित घटकांना करा मदत



यंदा आम्ही फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला आहे. फटाक्यांसाठी व्यर्थ पैसे खर्च न करता, हाच पैसा विधायक सामाजिक कार्यासाठी खर्च करणार आहोत. इतरांनीदेखील फटाकेमुक्त दिवाळी साजरी करावी. समाजातील वंचित घटकांच्या मदतीसाठी फटाक्यांचे पैसे खर्च करावेत.''

पूजा पिंपळे, विद्यार्थिनी.

## प्रदूषण टाळणार



देशभर दिवाळीचा सण साजरा केला जातो. अनेक ठिकाणी फटाके फोडली जातात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. आम्ही मात्र यंदा फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणार आहोत. फटाकेमुक्त दिवाळीसाठी 'दिव्य मराठी'ने सुरू केलेला उपक्रम खूप चांगला आहे. फटाक्यांवर खर्च होणारे पैसे आम्ही गरजूंना मदत म्हणून देणार आहोत.''

अर्चना गवळी, विद्यार्थिनी.

Scanned by CamScanner

सकाळ, नगर टुडे, पृष्ठ क्र 4,
दि. 23/12/2016

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१




**नगर : राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात मार्गदर्शन करताना अपर जिल्हाधिकारी भानुदास पालवे. समवेत प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, ज्ञानदेव पांडुळे आदी.**

# राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्त्व विकास

भानुदास पालवे; चास येथे काळे महाविद्यालयाचे शिबिर सुरू

**नगर, ता. २२ :** राष्ट्रीय सेवा योजना शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळेल, असे मत अपर जिल्हाधिकारी भानुदास पालवे यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे चास (ता. नगर) येथे उद्घाटन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष दादा कळमकर होते. पोलिस उपअधीक्षक तानाजी बरडे, प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य ज्ञानदेव पांडुळे, चासचे सरपंच सुरेश गायकवाड, उपसरपंच पोपट घुंगार्डे, सदस्य गजराज देवकर, ॲड. राजेंद्र गावखरे, राधाकृष्ण वाळुंज, सेवा संस्थेचे अध्यक्ष गुलाब कार्ले या वेळी उपस्थित होते.

कळमकर, बरडे, वाळुंज यांनी मनोगत व्यक्त केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा त्यांनी आढावा घेतला. तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये मोठी संधी असून, विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध अभ्यास करावा, असा सल्ला दिला. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली.

नगर जिल्हा एनएसएसच्या उपक्रमांची कर्मभूमी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रम अधिकारी प्रा. सहदेव आव्हाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. संजय नगरकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. बुवासाहेब ढेरे, प्रा. योगिता रांधवणे, प्रा. शुभांगी ढुबे, प्रा. बाळासाहेब गावखरे, प्रा. दशरथ शेळके यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. प्रा. डॉ. संगीता कुलकर्णी यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner

दैनिक दिव्य मराठी,
हॅलो अहमदनगर पृष्ठ क्र-3
दि. 23/12/2016.

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# एनएसएस शिबिरातून व्यक्तिमत्त्व विकास

## पालवे : राधाबाई काळे कॉलेजचे एनएसएस शिबिर

अहमदनगर : राष्ट्रीय सेवा योजनेसारख्या योजनेमधून विद्यार्थिनींनी स्वयंविकासाचे प्रशिक्षण घ्यावे. तसेच शिबिराच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास साधावा, असे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी भानुदास पालवे यांनी केले.

राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर उद्घाटन प्रसंगी चास येथे ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष दादाभाऊ कळमकर होते. याप्रसंगी उद्घाटक म्हणून पोलीस उपअधीक्षक तानाजी बरडे, प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य ज्ञानदेव पांडुळे, चासचे सरपंच सुरेश गायकवाड, उपसरपंच पोपटराव घुंगार्डे, सदस्य गजराज देवकर, ॲड. राजेंद्र गावखरे, राधाकृष्ण वाळुंज, सोसायटी अध्यक्ष गुलाबराव कार्ले उपस्थित होते. तानाजी बरडे यांनी स्पर्धा परीक्षेमध्ये मुलींना खूप संधी असून, उद्याच्या अधिकारी होण्यासाठी एन.एस.एस. च्या 'प्रशिक्षणातून स्वत:ला घडवावे, असे प्रतिपादन केले.



चास येथे आयोजित राधाबाई काळे महिला कॉलेजच्या एनएसएस शिबिर उद्घाटन प्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी भानुदास पालवे, संस्थेचे उपाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, पोलीस उपअधीक्षक तानाजी बरडे, प्राचार्य डॉ. कराळे.

प्राचार्य कराळे यांनी, अहमदनगर जिल्हा ही एन.एस.एस.ची जन्मभूमी आहे आणि स्वावलंबन, स्वाध्याय व समतेचा पुरस्कार करणारे आमचे महाविद्यालय असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. सहदेव आव्हाड यांनी केले, तर आभार प्रा. डॉ.संगीता कुलकर्णी यांनी मानले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय नगरकर यांनी केले. शिबिर यशस्वीतेसाठी प्रा. बुवासाहेब ढेरे, प्रा. योगिता रांधवणे, प्रा. शुभांगी ठुबे, प्रा.बाळासाहेब गावखरे व प्रा.दशरथ शेळके आदी परिश्रम घेत आहेत.

(प्रतिनिधी)

Scanned by CamScanner

दि. ९/२/२०१८ दै. लोकमत, हॅलो नगर
पान. नं. 8

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# विद्यार्थिनींच्या रूपाने उज्ज्वल भविष्य

## बुरुंगले : काळे महाविद्यालयात पदवीग्रहण सोहळा

**अहमदनगर :** पदवीग्रहण समारंभाच्या मिरवणुकीत सहभागी झालेल्या व पदवीग्रहण करणाऱ्या विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता पाहिल्यानंतर भारताला निश्चितच उज्ज्वल भविष्य असल्याचे प्रतिपादन पुणे येथील एस. एम. जोशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद बुरुंगले यांनी केले.

राधाबाई काळे महिला महाविद्यालयात आयोजित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीग्रहण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी पत्रकार बाळ बोठे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य भाऊसाहेब ढगे, प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी, सर्व प्राध्यापक व पदवीप्राप्त विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

प्राचार्य डॉ. बुरुंगले पुढे म्हणाले, ज्ञानरचनावाद हे जगापुढील प्रमुख सत्य असून, पदवीग्रहण करणाऱ्या विद्यार्थिनींनी मी कोण? माझे कार्य काय? मला नेमके कोठे जायचे? हे प्रश्न समोर ठेवून आपल्यातील प्रबळ इच्छाशक्तीला जागृत ठेवले पाहिजे. त्यासाठी डॉ. अब्दुल कलाम यांच्यासारख्या व ऑस्टिओपोरोसिससारख्या अपंगत्वावर मात करणाऱ्या खेळाडूंच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा आदर्श समोर हवा.

प्रारंभी प्रमुख मान्यवरांसमवेत स्नातकांची मिरवणूक व दीपप्रज्वलन झाले. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी केले. आभार परीक्षा अधिकारी प्रा. संतोष गायकवाड यांनी मानले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थिनींना पदव्या प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय नगरकर व वृषाली दिघे यांनी केले. (प्रतिनिधी)

Scanned by CamScanner

दै. पुढारी दि. ९।२।२०१७ पुरवणी पान. नं. ४

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# भारताला निश्चितच चांगले भविष्य

## डॉ. बुरुंगले; महिला महाविद्यालयात पदवीग्रहण समारंभ

**नगर : प्रतिनिधी**

पदवीग्रहण समारंभाच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्यांना व पदवीग्रहण करणाऱ्या विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता पाहिल्यास भारताला नक्कीच चांगले भविष्य असल्याचे प्रतिपादन एस.एम. जोशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद बुरुंगुले यांनी केले.

येथील राधावाई काळे महिला महाविद्यालयात आयोजित सावित्रीवाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीग्रहण समारंभात प्रमुख पाहुने म्हणून ते बोलत होते. यावेळी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य भाऊसाहेब ढगे, प्राचार्य भाऊसाहेव कराळे, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी आदींसह सर्व प्राध्यापक व पदवीग्रहन समारंभासाठी आलेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नगर :** राधाबाई काळे महिला महाविद्यालयात पदवीग्रहण समारंभप्रसंगी डॉ. अरविंद बुरुंगले, भाऊसाहेब ढगे, प्राचार्य भाऊसाहेब कराळे आदी.

बुरुंगले म्हणाले की, ज्ञानरचनावाद हे जगापुढील प्रमुख सत्य असून, पदवीग्रहण करणाऱ्या विद्यार्थिनींनी मी कोण?, माझे कार्य काय?, मला नेमके कोठे जायचे? हे सर्व प्रश्न समोर ठेऊन आपल्या प्रबळ इच्छाशक्तीला जागृत ठेवले पाहिजे. त्यासाठी डॉ. एपीजे अब्दूल कलाम यांच्यासारख्या व ऑस्टल पिस्टोरिअससारख्या अपंगत्वावर मात करून खेळाडूच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा आदर्श मानून पुढे गेले पाहिजे.

प्रारंभी प्रमुख पाहुन्यांच्या हस्ते स्नातकांची मिरवणूक व दीपप्रज्वलन झाले. प्रास्ताविक प्राचार्य भाऊसाहेब कराळे यांनी केले. आभार परीक्षा अधिकारी संतोष गायकवाड यांनी मानले. त्यानंतर प्रमुख पाहुन्यांच्या हस्ते विद्यार्थिनींना पदव्या प्रदान करण्यात आल्या. सुत्रसंचालन प्रा. संजय नगरकर यांनी केले.

Scanned by CamScanner

दि. ५/१/२०१८ लोकमत अ.नगर
पान नं. 9.

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१



# सावित्री बाईंचे विचार घेऊन स्वावलंबी बना

## ठुबे : राधाबाई काळे कॉलेजमध्ये फुले जयंती

अहमदनगर : प्रतिकूल परिस्थितीतून सावित्रीबाई फुले घडल्या. त्यांचे कार्य व विचार आजच्या मुलींना प्रेरणादायी आहेत. प्रत्येकीने स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनले पाहिजे, असे प्रतिपादन वाणिज्य विभागाच्या प्रा. शुभांगी ठुबे यांनी केले.

येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी, विद्यार्थिनींनी परिस्थितीपुढे हार न मानता परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर विकसित झाले पाहिजे. तरच आधुनिक सावित्री म्हणून आपण जीवनात उभ्या राहू शकू, असा सल्ला दिला.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी, प्रा. डॉ. मनोहर करांडे, प्रा. किसन पायमोडे व सर्व शिक्षक उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय नगरकर यांनी केले. प्रा. डॉ. वैशाली पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. वृषाली दिघे यांनी केले.

(प्रतिनिधी)



राधाबाई काळे महिला महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमात बोलताना प्रा. शुभांगी ठुबे.

दै. सकाळ दि. १/४/२०१८
पान नं. ३

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# प्रबळ इच्छाशक्ती जागृत ठेवा : बुरुंगले

**सकाळ वृत्तसेवा**

नगर, ता. ३१ : महाविद्यालयीन शिक्षणानंतर पदवी ग्रहण केलेल्या विद्यार्थ्यांनी प्रबळ इच्छाशक्ती जागृत ठेवून ध्येयाच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव प्राचार्य डॉ. अरविंद बुरुंगले यांनी केले.

राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या पदवीग्रहण समारंभात डॉ. बुरुंगले बोलत होते. 'सकाळ'चे निवासी संपादक ॲड. डॉ. बाळ ज. बोठे पाटील अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी, महाविद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य भाऊसाहेब ढगे, प्रा. मनोहर करांडे, प्रा. संतोष गायकवाड आदी व्यासपीठावर होते.

खडतर परिस्थिती व अपंगत्वावर मात करीत यशाची शिखरे सर केलेल्या अनेकांचे दाखले देत प्राचार्य बुरुंगले यांनी मार्गदर्शन केले. भारतात मुलींची वाढती गुणवत्ता विचारात घेता, भारताला चांगले भविष्य असल्याचे दिसते, असे ते म्हणाले. डॉ. बोठे पाटील यांनी जिद्द, चिकाटी व परिश्रम ही त्रिसूत्री अंगीकारण्याचे आवाहन करीत, 'सकाळ'च्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. कराळे यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या उपक्रमांचा आढावा घेतला. प्रा. डॉ. संजय नगरकर व प्रा. वृषाली दिघे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संतोष गायकवाड यांनी आभार मानले.



**नगर : राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील, पदवी ग्रहण केलेल्या विद्यार्थिनींसमवेत प्राचार्य डॉ. अरविंद बुरुंगले, ॲड. डॉ. बाळ ज. बोठे पाटील, डॉ. भाऊसाहेब कराळे, डॉ. भाऊसाहेब औटी, भाऊसाहेब ढगे, प्रा. संतोष गायकवाड, प्रा. मनोहर करांडे. (छायाचित्र : सचिन कांबळे)**

Scanned by CamScanner

दि. १०।२।२०१८ दै. लोकमत
हॅलो नगर. पान. नं. ४

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

लोकमत

# काळे महिला महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यू

**अहमदनगर :** राधाबाई काळे महिला महाविद्यालयात झालेल्या बंगलोर येथील कंपनीच्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींची निवड झाली असून या विद्यार्थिनींना ३.१५ लाखांहून अधिक वार्षिक वेतनाचे पॅकेज मिळणार आहे.

लेखी, मौखिक व अंतिम निवड या तीन टप्प्यात झालेल्या या मुलाखत सत्रात जिल्ह्यातील १०९ विद्यार्थी सहभागी झाले. त्यातील १७ विद्यार्थ्यांची निवड अंतिम फेरीत झाली. ज्यात महाविद्यालयाच्या ४ विद्यार्थिनींचा समावेश आहे. याप्रसंगी कंपनीचे व्यवस्थापक डॉ. अमोल गडाख, अतुल गोधा, रसायनशास्त्र विभागाचे प्रा. हेमंत अकोलकर, प्रा. डॉ. प्रतिभा रांधवणे उपस्थित होते.

यशस्वी विद्यार्थिनींचे प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे, आ. अशोक काळे, दादाभाऊ कळमकर,स्नेहलताई शिंदे, आशुतोष काळे, ज्ञानदेव पांडुळे आदींनी अभिनंदन केले. (प्रतिनिधी)

Scanned by CamScanner

दि. २३/४/२०१८ दैनिक महाराष्ट्र टाईम्स पुरवणी
अहमदनगर टाईम्स पान. नं. ९

राधाबाई काळे महिला ... ग्रंथालय अहमदनगर-४१४००१

# 'परिस्थितीवर मात करून पुढे जा'

म. टा. प्रतिनिधी, नगर

'परिस्थितीचे भांडवल करुन जीवनापासून दूर पळणारे खूप असतात. परंतु विद्यार्थिनींनी परिस्थितीवर मात करून पुढे जाण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवावी,' असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीना जगधने यांनी केले.

राधाबाई काळे महिला महाविद्यालयामध्ये जगधने यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला साहित्यिक डॉ. संजय कळमकर, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य आशुतोष काळे, दादा कळमकर, डॉ. रावसाहेब अनभुले, ज्ञानदेव पांडुळे, माजी प्राचार्य विश्वासराव काळे, संदेश कार्ले उपस्थित होते.

श्रीकांत चंगारी



गुणवंत विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

'मुलगी असल्याचा आपल्या मनातील न्यूनगंड काढून टाका, व स्वत:ची क्षमता ओळखून त्यादिशेने वाटचाल करा. ज्या पुस्तकांमुळे आपल्याला प्रेरणा मिळते, त्यांचे सातत्याने वाचन करावे. तसेच कॉलेजमध्ये असताना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यावर भर द्या. कारण अधिकारी बनल्यानंतर समाजासाठी काम करण्याची संधी मिळू शकते,' असेही जगधने यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी क्रीडा विभाग, विद्यापीठ परीक्षा, सांस्कृतिक विभाग अशा विविध विभागातून राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केलेल्या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. संशोधन क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्राध्यापकांनाही कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय नगरकर व प्रा. वृषाली दिघे यांनी केले व उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner

दि. ८/३/२०१८, दै. लोकमत
पान. नं. 2

राधाबाई काळे महिला महाविद्यालय ग्रंथालय अहमदनगर-४१४००१



राधाबाई काळे महिला महाविद्यालयात आयोजित माजी विद्यार्थिनी व पालक मेळाव्यात बोलताना पालक.

# विद्यार्थिनी-पालकांच्या प्रेमाने शिक्षक गहिवरले

## राधाबाई काळे कॉलेज : माजी विद्यार्थिनी, पालक मेळावा

**अहमदनगर :** काही नोकरीत उच्चपदावर पोहोचलेल्या, तर काहींनी स्वतःच्या हिमतीवर उद्योग भरभराटीला आणलेला, काही गृहिणी म्हणून उत्तम घर सांभाळणाऱ्या, तर काही ध्येयपूर्तीसाठी अजूनही शिक्षणाच्या प्रवाहात असलेल्या... अशा या चारचौघींची मैफल जमली ती येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयात. निमित्त होते महाविद्यालयाने आयोजित केलेल्या माजी विद्यार्थिनी व पालक संवाद मेळाव्याचे.

मेळाव्यात सुमारे ७५ माजी विद्यार्थिनी व ११५ पालक सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी, शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर कलगुंड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माजी विद्यार्थिनी महासंघाच्या सचिव वर्षा ठाणगे-शेटे, अध्यक्षा विद्या तनपुरे-चव्हाण, प्रसिद्धी विभागप्रमुख प्रियांका चिखले, भाग्यश्री तरटे, शिल्पा दळवी, ज्योती बोरुडे, वसुधा खाकाळ, विद्या मोहिते, सय्यद हिना, सना शेख, संध्या पाडुळकर, ललिता सरोदे या माजी विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली. तुम्हीही घडू शकता, प्रयत्नांवर श्रद्धा ठेवा, भविष्याचा पाया हा महाविद्यालयातच घडतो, खरी स्पर्धा स्वतःशीच असते, मुलगी असल्याचा मनातील न्यूनगंड काढून टाका, असा सल्ला मान्यवरांनी दिला. कलगुंड म्हणाले की, मुलींना सक्षम बनविण्यासाठी महाविद्यालयाने चालविलेल्या प्रयत्नांना पालकांनीही साथ दिली पाहिजे. काही पालकांनीही मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. कराळे म्हणाले, येथून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थिनींनी आपले माहेर समजून हक्काने महाविद्यालयात केव्हाही यावे. येथील सुविधांचा लाभ घ्यावा. महाविद्यालयातून बाहेर पडणारी आपली प्रत्येक मुलगी स्वावलंबी, स्वाभिमानी व आत्मनिर्भर असेल. त्यासाठी पालकांनीही वेळोवेळी सूचना कराव्यात. कार्यक्रम यशस्वितेसाठी माजी विद्यार्थिनी संघटनेच्या समन्वयक डॉ. सुमन पवार, पालक संघाचे समन्वयक प्रा. संभाजी कातोरे व सहकारी प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा. डॉ. मनोहर करांडे यांनी, तर आभार उपप्राचार्य डॉ. औटी व डॉ. प्रतिभा रांधवणे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय नगरकर, प्रा. वृषाली दिघे यांनी केले. (प्रतिनिधी)

Scanned by CamScanner

सकाळ, नगर
दि. 14 मे 2017 पृष्ठ क्र. 3





नगर : राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे दादा कळमकर यांचा सत्कार करताना आमदार अरुण जगताप. समवेत आमदार संग्राम जगताप, लक्ष्मण वाडेकर, माणिक विधाते, अशोक बाबर, अभिषेक कळमकर, विपुल शेटिया आदी.

# 'रयत'ने बहुजनांची मुले शिकवली : अरुण जगताप

नगर, ता. १३ : रयत शिक्षण संस्थेने बहुजन समाजातील गरिबांची मुले शिकविली. त्यातूनच बहुजन समाजाची शैक्षणिक, वैचारिक व आर्थिक प्रगती झाली. संस्थेवर कामाची संधी मिळालेल्या दादा कळमकर व डॉ. भाऊसाहेब कराळे, अशा माणसांवर 'रयत'चे सर्वेसर्वा शरद पवार यांनी कायम विश्वास ठेवला. ही निष्ठेची पावतीही आहे. तीच बाब जिल्ह्यासाठी भूषणावह असल्याचे मत आमदार अरुण जगताप यांनी व्यक्त केले.

शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे संस्थेच्या उत्तर विभागीय अध्यक्षपदी दादा कळमकर व सचिवपदी राधाबाई काळे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. आमदार संग्राम जगताप, लक्ष्मण वाडेकर, शहर-जिल्हाध्यक्ष माणिक विधाते, अशोक बाबर, अभिषेक कळमकर, नगरसेवक विपुल शेटिया, संभाजी पवार, सलीम शेख, अतुल भंडारी, सुरेश बनसोडे, अभिजित खोसे, रेश्मा आठरे, ॲड. शारदा लगड, साधना बोरुडे, रेखा जरे पाटील, राजश्री मांढरे, संजय झिंजे आदी या वेळी उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, "कळमकर यांचे पक्षवाढीसाठी मोठे योगदान आहे. एकनिष्ठता, प्रामाणिकता व चांगल्या कामाचे त्यांना फळ मिळाले." कळमकर म्हणाले, "संधी मिळाल्यानंतरही नेहमीच पाय जमिनीवर ठेवून काम केले. राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्त्व दिले." प्रकाश भागानगरे यांनी सूत्रसंचालन केले. माणिक विधाते यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner

लोकमत, हॅलो अहमदनगर
दि. 14 मे. 2017, पृष्ठ क्र. 4.

राधाबाई काळे महिला महाविद्यालय
ग्रंथालय
अहमदनगर-४१४००१

# कराळे यांनी सचिवपदाचे सोने करावे

## कळमकर : रयत संस्थेवर संधी मिळाल्याने सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** रयत शिक्षण संस्थेसारख्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या संस्थेने आजपर्यंत जिल्ह्याला अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य दिले. इतिहासामध्ये दुसऱ्यांदा संस्थेचे सचिव हे मोठे पद प्राचार्य कराळे यांना मिळाले, त्यांनी त्याचे सोने करावे, असे प्रतिपादन दादाभाऊ कळमकर यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या सचिवपदी राधाबाई काळे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. भाऊसाहेब कराळे यांची, तर उत्तर विभागीय सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची निवड झाल्याबद्दल दोघांचा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेच्या सचिवपदी राधाबाई काळे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. भाऊसाहेब कराळे यांची, तर उत्तर विभागीय सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची निवड झाल्याबद्दल दोघांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी कळमकर बोलत होते.

याप्रसंगी, पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी अध्यक्ष अरुणराव ठाणगे, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य डॉ. रावसाहेब अनभुले, नगर तालुक्यातील विविध विद्यालयांचे मुख्याध्यापक, ज्ञानदेव पांडुळे, कराळे यांच्या मातोश्री रंगूबाई कराळे, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

कळमकर पुढे म्हणाले की, संस्थेमध्ये प्राध्यापक म्हणून काम करताना कराळे यांचे संशोधन, अध्यापन, देणगी संकलन, विविध प्रकारचे शैक्षणिक प्रयोग, महाविद्यालयाची रचनात्मक उभारणी, सर्वसमावेशक प्रशासन हे गुण हेरूनच त्यांची नियुक्त सचिवपदी झाली आहे. संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी गुणात्मकतेला न्याय देऊन संस्थेची व रयतेची सेवा करण्याची जबाबदारी आमच्यावर सोपवली आहे. ती आम्ही पार पाडू, असे त्यांनी सांगितले.

कराळे म्हणाले, एका सामान्य शेतकऱ्याच्या मुलाला हा सन्मान मिळाला आहे. त्यात स्व. शंकरराव काळे, माझे आई-वडील, महाविद्यालयातील सहकारी सेवक यांचा सर्वांचा वाटा आहे. यावेळी कराळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

आजीव सेवकपदी नियुक्ती झाल्याबद्दल महादजी शिंदे विद्यालयाचे मुख्याध्यापक तुकाराम कन्हेरकर यांचाही सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय नगरकर, तर आभार प्रा. डॉ. मनोहर करांडे यांनी मानले.

Scanned by CamScanner